नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १९४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. २३ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### आरक्षणावर हरकती मागवल्या

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील एकूण ८४३ ग्रामपंचायतीच्या प्रभागनिहाय आरक्षण सोडतीवर २५ जूनपर्यंत हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत. त्यानंतर जिल्हाधिकारी १० जुलैला अंतिम प्रभाग रचना जाहीर करणार आहेत. असे असले तरी या ग्रामपंचायतींच्या निवडणुका केव्हा होतील, याची संदीग्धता कायम आहे. जिल्ह्यात एकूण १३३२ ग्रामपंचायती आहेत. त्यातील निम्म्यापेक्षा अधिक म्हणजे ८४३ ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे किंवा डिसेंबर २०२६ पर्यंत संपणार आहे. या ग्रामपंचायतींना निवडणुकीची प्रतिक्षा आहे. सध्या या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त आहेत. प्रशासक म्हणून विद्यमान सरपंचांना नियुक्त करण्यात आले आहे. मात्र न्यायालयाने या सरपंचांना केवळ दैनंदिन काम पाहण्यापूरताच अधिकार असेल, असे आदेश दिले आहेत. धोरणात्मक निर्णय घेण्यावर बंधन आणलेली आहेत.

### ताकदवान लोक नकोत, गुलाम हवेत

मुंबई (स. गांवकरी) : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात आज अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा बंडखोर खासदारांनी प्रवेश केला आहे. मुंबईतील यशवंतराव सेंटर येथे या बंडखोर खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश केला. त्यानंतर ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना पहिली प्रतिक्रिया दिली. शिवसेनेत मला एका व्यक्तीचा प्रॉब्लेम होता. त्याचामुळे मी हा पक्ष सोडल्याचा दावा यावेळी पाटील यांनी केला आहे. तसंच ताकदवान लोक यांना नकोत फक्त गुलाम हवेत असं म्हणत संजय दिना पाटील यांनी उद्धव ठाकरेंनी टोला लगावला.

### महाराजस्वची मेजवानी, ५० लाख कुटुंबांना लाभ

मुंबई (स. गांवकरी) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यभरात 'महाराजस्व अभियान' अत्यंत प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या महाअभियानाच्या माध्यमातून राज्यातील तब्बल ५० लाख कुटुंबांपर्यंत शासकीय सेवा आणि विविध योजनांचे लाभ थेट पोहोचविण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आमदार प्रसाद लाड, आमदार मनिषाताई कायंदे, योगेश टिळेकर, सर्व विभागीय आयुक्त, नोंदणी महानिरीक्षक, जमाबंदी आयुक्त यांनी बैठकीत सहभाग घेतला.

### सॅलरी स्लिप दिसणार

वर्धा(स. गांवकरी) : कोणत्याही कर्मचाऱ्यास मासिक वेतन हा उत्सुकतेचा भाग असतो. ते नियमित मिळावे ही अपेक्षा, पण १ तारखेस वेतन मिळाले नाही की जीव कासावीस होते कारण अनेक हफ्ते भरायचे असतात. म्हणून वेतन झाले याची निश्चिती आता करता येणार आहे. महाराष्ट्र राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी आहे. राज्य शासनाच्या शालार्थ या एकात्मिक वित्त व्यवस्थापन प्रणाली प्रणालीद्वारे कर्मचाऱ्यांना आता त्यांची प्रत्येक महिन्याची सॅलरी स्लिप (पगार पत्रक) ऑनलाईन पाहता आणि थेट डाऊनलोड करता येणार आहे. या संदर्भातील माहिती देणारे एक मार्गदर्शक पत्रक सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले असून, यामुळे कर्मचाऱ्यांना आता कार्यालयाच्या चकरा मारण्याची गरज उरणार नाही. ही प्रक्रिया अत्यंत सोपी आणि टप्प्याटप्प्याने स्पष्ट करण्यात आली आहे.

# बंडखोर खासदारांचा शिवसेनेत प्रवेश

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यात शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे, अखेर शिवसेना ठाकरे गटाच्या 6 बंडखोर खासदारांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. या बंडखोर खासदारांमध्ये संजय जाधव, भाऊसाहेब वाघचौरे, ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील, संजय देशमुख आणि नागेश पाटील आष्टीकर यांचा समावेश आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये त्यांनी आज मुंबईमध्ये शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे आता शिवसेना शिंदे गटाच्या खासदारांची संख्या वाढून 13 झाली आहे, तर आता शिवसेना ठाकरे गटाकडे अवघे तीनच खासदार आहेत.

दरम्यान 2024 मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष ठरला होता काँग्रेसकडे 14 खासदार आहेत, तर दुसऱ्या क्रमांकावर शिवसेना ठाकरे गट होता, शिवसेना ठाकरे गटाचे 2024 च्या निवडणुकीमध्ये 9 खासदार निवडून आले होते, परंतु यातील आता 6 खासदार फुटल्याने त्यांच्याकडे आता केवळ तीनच खासदार राहिले आहेत. दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे सात खासदार होते, मात्र सहा बंडखोर खासदारांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यानं आता शिवसेना शिंदे गटाच्या खासदारांची संख्या ही 13 वर पोहोचली आहे. तर भाजपकडे सध्या राज्यात 9 खासदार आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे एक खासदार आहे. याचाच अर्थ आता महायुतीमध्ये राज्यात शिवसेना शिंदे गट नंबर एकचा पक्ष बनला आहे. त्यांच्याकडील खासदारांची संख्या 13 वर पोहोचली आहे. तर राज्यात खासदारांच्या संख्येमध्ये काँग्रेस नंबर एकचा पक्ष असून त्यांच्याकडे 14 खासदार आहेत. आज या खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी एक मोठी घोषणा देखील केली आहे. सहाचे सहा खासदार हे पुढच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेच्या तिकीटावर उभे राहतील. धनुष्यबाणावर उभे राहतील आणि ते निवडून देखील येतील. शिवसेनेत हे सर्वजण सामील झाले आहेत. स्वखुशीने हा यातील सर्वात मोठा भाग आहे, असंही यावेळी शिंदे यांनी म्हटलं आहे. या सर्व पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला आहे.



### एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंचं आव्हान स्वीकारलं

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मोठा धक्का बसला असून 6 बंडखोर खासदारांनी आज एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. यामुळे शिवसेनेची ताकद वाढली आहे. खासदार फुटल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी संबंधित खासदारांच्या मतदारसंघात जात सभा घेण्याचा निर्णय घेतला आहे. काल उद्धव ठाकरे यांनी खासदार संजय दिना पाटील यांच्या मुंबईतील मतदार संघात जात सभा घेतली. यावेळी त्यांनी भाजप ईशान्य मुंबईची जागा मिंध्यांना सोडणार आहे का? असं विधान केलं होतं. एकनाथ शिंदे यांनी आता ठाकरेंच्या या विधानावर भाष्य करत मोठं विधान केलं आहे. उद्धव ठाकरेंच्या विधानाचा अर्थ असा होता की, शिवसेनेत प्रवेश केलेल्या खासदारांना पुढील लोकसभेत उमेदवारी मिळणार नाही. मात्र आता एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले की, 'सहाचे सहा खासदार हे शिवसेनेच्या तिकीटावर उभे राहतील. धनुष्यबाणावर उभे राहतील आणि ते निवडून येतील. शिवसेनेत हे सर्वजण सामील झाले आहे. तुम्ही समजून घ्या काय समजून घ्यायचं ते.' अशाप्रकारे एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंचे आव्हान स्वीकारले आहे. या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, 'सहा खासदार सोबत आले आहेत. लाखो लोकांनी मतदान केल्याने ते निवडून आले आहेत. त्या ठिकाणी आमचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिक आणि जनता आणि सहा लोकांची ताकद आता वाढली आहे. त्या ठिकाणी शिवसेना अधिक बळकट होईल. त्यांच्या मतदारसंघातील विकास कामं, प्रश्न आणि प्रकल्प प्रामाणिकपणे सोडवण्याचं काम शिवसेना करेल हा एकनाथ शिंदेंचा शब्द आहे.'

# लखनऊ अग्नितांडवातील तरुणांचे शेवटचे फोन कॉल्स

मुंबई : (स. गांवकरी)

"बाबा, मला कसंही करून वाचवा ना... बाहेर पडायला कुठेच जागा नाहीये," इमारतीला लागलेल्या भीषण आगीत अडकलेल्या २३ वर्षांच्या सुखमणीचा हा त्याच्या वडिलांना आलेला शेवटचा फोन. उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊमधील अलिगंज भागात एका तीन मजली इमारतीला लागलेल्या भीषण आगीने अनेकांचे संसार उद्ध्वस्त केले. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या तरुणांच्या कुटुंबीयांनी किंग जॉर्ज मेडिकल युनिव्हर्सिटीच्या शवगृहाबाहेर केलेला आक्रोश उपस्थितांचे काळीज पिळवटून टाकणारा होता. मृत्यूच्या दारात उभे असताना या तरुणांनी आपल्या कुटुंबीयांना केलेले शेवटचे फोन कॉल्स आता समोर आले असून, ऐकणाऱ्याच्या अंगावर काटा आल्याशिवाय राहत नाही. या अग्नितांडवामध्ये सुखमणी सिंग (वय २३) या गेम डिझायनर तरुणानं आपला जीव गमावला. तो या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या एका ग्राफिक्स आणि ॲनिमेशन सेंटरमध्ये शिकवत होता. सुखमणीचे वडील प्रभजोत सिंग यांनी डोळ्यातले अश्रू आवरत सांगितले की, "दुपारी २ च्या सुमारास सुखमणीचा फोन आला. तो प्रचंड घाबरला होता. 'बाबा मुझे बचा लो' (बाबा मला वाचवा) असं म्हणत तो रडत होता. इमारतीतून बाहेर पडायला कुठेच रस्ता उरला नसल्याचं त्यानं सांगितलं." पण, दुर्दैवानं त्याचे ते शब्द शेवटचेच ठरले. याच ॲनिमेशन सेंटरमध्ये काम करणारा २७ वर्षांचा जॉयनील चक्रवर्ती हा देखील या आगीचा बळी ठरला. जॉयनीलचे नातेवाईक विश्वनाथ सरकार यांनी सांगितले की, दुपारी दोनच्या सुमारास जॉयनीलने लखनऊमध्येच राहणाऱ्या त्याच्या काकूंना फोन केला होता. "काकू, आम्ही इथे वाईट अडकलोय, प्लीज आम्हाला कसंही करून वाचवा," अशी आर्त हाक त्याने दिली. फोन येताच कुटुंबीय तातडीने घटनास्थळाकडे धावले. "आम्ही दुपारी ३ च्या सुमारास घटनास्थळी पोहोचलो. अग्निशमन दल आणि प्रशासनाने इमारतीची भिंत तोडण्याचा निर्णय आधी घेतला असता, तर कदाचित आमच्या मुलांचे प्राण वाचले असते," असा आरोप जॉयनीलच्या नातेवाइकांनी केला आहे. "आमच्या देखत त्यांनी भिंत तोडायला सुरुवात केली, तोपर्यंत आमचा जॉयनीलशी फोनवर संपर्क सुरू होता. पण वेळ निघून गेली होती," असं विश्वजीत यांनी अत्यंत जड अंतःकरणाने सांगितले.



- दुर्घटनेत होरपळून १५ जणांचा मृत्यू!

# देवस्थान इनाम जमीन कायद्यावर हरकतीचा पाऊस

मुंबई : (स. गांवकरी)

- एकट्या पुणे विभागातून १६ हजार हरकती

राज्यातील देवस्थान इनाम जमिनींचे संवर्धन करण्यासह वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले समस्या मार्गी लावण्यासाठी सर्वंकष कायदा तयार करण्यात यावा, अशा स्पष्ट सूचना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या आहेत. सोमवारी मंत्रालयात 'देवस्थान इनाम जमीन धोरण प्रारूप समिती'ची पहिली बैठक पार पडली. यावेळी कायद्याचा कृती आराखडा निश्चित करण्यासाठी टप्पे ठरविण्यात आले. हा नवा कायदा करताना उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच इतर जुन्या कायद्यांचा सखोल अभ्यास केला जावा आणि भविष्यात कोणतीही नवीन कायदेशीर गुंतागुंत किंवा सर्वसामान्यांच्या अडचणी वाढणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी, असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले. समितीचे सचिव कैलास गायकवाड यांनी मागील प्रारूपावर राज्यभरातून आलेल्या हरकती व सूचनांची माहिती दिली. पुणे विभागातून १६ हजार, नाशिक साडेपाच हजार, कोकण १३५०, नागपूर २२५ तर अमरावती विभागातून ५० सूचना व हरकती आल्या आहेत. महसूल विभागाचे अप्पर मुख्य व समितीचे अध्यक्ष सचिव खारगे यांनी समितीच्या कामकाजाची दिशा स्पष्ट केली. ते म्हणाले, या प्रक्रियेत प्रत्येक कामाची आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाईल, तसेच इतर राज्यांतील वेगवेगळ्या कायद्यांचा आणि सध्याच्या कायदेशीर बाबींचा सखोल अभ्यास करूनच अंतिम निर्णय घेतला जाईल. घाईगडबड न करता एकाच वेळी सर्व विषयांना हात न घालता, एक-एक विषय घेऊन त्यावर सविस्तर चर्चा केली जाईल, ज्यामध्ये गावठाणांसह इतर सर्व घटकांचा समावेश असेल.

# RTI कायदा दुरुस्ती विरोधात अण्णा आक्रमक

- मुख्यमंत्री फडणवीसांना पत्र
- अण्णा हजारे उपोषणाला बसणार

### माहिती अधिकार या कायद्याची परिणाम कारकता कमी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

RTI कायदा दुरुस्ती विरोधात अण्णा प्रचंड आक्रमक झाले असून, नागरिकांचा माहितीचा अधिकार अबाधित राहणे ही लोकशाहीची मूलभूत गरज असूनही सरकारी याबाबत जोपर्यंत सकारात्मक निर्णय घेत नाही. त्यामुळे सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास, पाच जुलैपासून बेमुदत उपोषण करण्यात येईल असा इशारा अण्णा हजारे यांनी दिला आहे. आणि अण्णा पुन्हा एकदा उपोषणाला बसणार आहेत.

करणाऱ्या प्रस्तावित दुरुस्त्या तातडीने मागे घ्याव्यात, अन्यथा ५ जुलैपासून राळेगणसिद्धी येथे बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्राद्वारे दिला आहे. यामध्ये माहिती अधिकार कायद्यातील प्रस्तावित



दुरुस्त्या तसेच शुल्कवाढीबाबत हजारे यांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली.

या पत्रात हजारे यांनी म्हटले आहे की, माहिती अधिकार कायदा हा सामान्य नागरिकांच्या हातातील भ्रष्टाचार विरोधातील एक प्रभावी शस्त्र आहे. सदर कायद्यात बदल करून कायद्याची धार बोथट करण्याचा कोणताही प्रयत्न लोकशाहीसाठी घातक ठरणारा असून. यासाठीच उपोषण करणार असल्याचे सांगितले. सदर बदलांमुळे माहिती आयोगाचे अधिकार कमी होण्याची शक्यता आहें, नागरिकांना मिळणाऱ्या माहिती प्रक्रियेत यामुळे अडथळे निर्माण होऊ शकतात. आणि शासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वावरही त्याचा परिणाम गंभीर होण्याची भीती अण्णांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली आहे.

माहिती अधिकार कायद्यामुळे मागील दोन दशकांत अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली असून, सामान्य नागरिकांना न्याय मिळविण्या साठीचे प्रभावी साधन म्हणून याकडे पाहिले जाते.कायद्याचे मूळ स्वरूप कायम ठेवून जनहिताला बाधा पोचवीणाऱ्या तरतुदी मागे घ्याव्यात, अशी मागणीही अण्णांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराला धोका न पोचता. माहिती अधिकार अबाधित राहणे ही लोकशाहीची मूलभूत गरज असून, सरकारने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा ५ जुलैपासून बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही अण्णांनी दिला आहे.

# कंत्राटी कर्मचाऱ्याला महिन्याला ३८ हजार रुपये

### बेस्ट कर्मचाऱ्यांची चांदी : कायमस्वरुपी कर्मचाऱ्याला १५ ते २० हजारांची वाढ



मुंबई : (स. गांवकरी)

बेस्ट कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्वता मंजुरी मिळाली आहे. सातवा वेतन आयोग लागू झाल्यास बेस्टमधील कायमस्वरुपी कर्मचाऱ्याला १५ ते २० हजार रुपयांची वाढ मिळण्याची शक्यता आहे. समान काम समान वेतन कायद्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्याला महिन्याला ३८ हजार रुपये पगार मिळणार आहे. विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेस्टच्या कर्मचाऱ्यांनी तीन दिवसांचा संप पुकारला होता. संपावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वाखाली तोडगा काढण्यात आला. बेस्टमधील कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांचा वर्ष २०१६ ते २०२१ वेतन करार झालेला नाही. वेतन करारासंदर्भात बेस्ट प्रशासनाशी येत्या ७ दिवसांत चर्चा करून वेतन करार केले जाणार आहेत. तोपर्यंत कायम कामगारांना अंतरिम वाढ म्हणून ३ हजार रुपये देण्याचा निर्णय झाला आहे. वेतन करार झाल्यावर ही वाढ सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार असेल. कंत्राटी कर्मचाऱ्यांना २ हजार रुपयांची मासिक हंगामी वाढ दिली आहे. तसेच समान काम समान वेतनानुसार कायद्याच्या चौकटीत राहून सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्यात येणार आहे. या वेतनश्रेणीनुसार कंत्राटी कामगारांचे वेतन ३८ हजार रुपये होईल. याशिवाय कंत्राटी कर्मचाऱ्यांना वयोमर्यादा आणि सेवा अनुभव पाहून बेस्टच्या कायमस्वरूपी सेवेत घेण्याचा तत्त्वतः निर्णय झाला आहे. त्यासाठी सेवा भरती प्रक्रिया वयोमर्यादा शिथिल करून १० टक्के गुण अधिक देऊन बेस्ट सेवेत सामावून घेतले जाणार आहे. बेस्टच्या ताफ्यात पुढील तीन वर्षात ५ हजार बस घेण्यात येणार आहेत. एका बसमागे ११ कर्मचारी लागतात. त्यामुळे भविष्यात बेस्टच्या ताफ्यात येणाऱ्या ५ हजार बससाठी मोठ्या संख्येने मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. बसकरिता आवश्यक मनुष्यबळ कंत्राटी कर्मचाऱ्यांमधून ७० टक्के घेण्यात येणार आहे. त्यामुळे बेस्टमधील कर्मचाऱ्यांची संख्या ५० हजारापर्यत जाणार आहे.

**परिवहन मंत्र्यांची शिष्टाई फळाला** : बेस्ट कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी बेस्ट प्रशासन, राज्य सरकार कोणीही पुढाकार घेत नव्हते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संप मिटविण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे तिसऱ्या दिवशी बेस्ट कर्मचाऱ्यांचा संप मिटला. अन्यथा आणखी काही दिवस संप चालला असता. परिवहन मंत्र्याची शिष्टाई फळाला आली.
**– गजानन नागे, सरचिटणीस, भाजप बेस्ट कामगार संघ**

# एमपीएससीचा वेगवान कारभार! राज्यसेवा पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर

पुणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२६ मधील राज्यसेवा गट-अ व गट-ब परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. पूर्व परीक्षेतून एकूण ४१०३ उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. विशेष म्हणजे, पूर्व परीक्षेनंतर महिन्याभरातच निकाल जाहीर करून एमपीएससीने वेगवान कारभाराचा प्रत्यय दिला आहे. एमपीएससीतर्फे महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२६ ही परीक्षा ३१ मे रोजी घेण्यात आली. पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेकरिता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावांची यादी, गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. या परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांच्या पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकीच मुख्य परीक्षेसाठी दिलेल्या मुदतीत अर्ज करून परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. मुख्य परीक्षेसंदर्भातील अधिसूचना स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या परीक्षेचा निकाल सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयात दाखल रिट यचिका, तसेच इतर आरक्षणासंदर्भात न्यायालयात, न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला आहे, असेही स्पष्ट करण्यात आले. एमपीएससीने जाहीर केलेल्या निकालानुसार पूर्व परीक्षेत पात्र ठरलेल्या एकूण ४०१३ उमेदवारांची मुख्य परीक्षेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यात अहिल्यानगर येथील १९३, अकोला येथील ४४, अलिबाग येथील ३.




- ४१०३ उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र

## थोडक्यात पण महत्वाचे



### भामकाई देवराई प्रकल्पांतर्गत एक हजार झाडांचे वृक्षारोपण

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील मांदारणे येथे 'भामकाई देवराई' प्रकल्पांतर्गत वसुंधरा अभियान बाणेर, शिवभूमी सह्याद्री चॅरिटी, ग्रीन व्हिजन फाऊंडेशन आणि शिवनेरी चे शिलेदार गृप यांचा संयुक्त विद्यमाने एक हजार पेक्षा जास्त झाडे लावून या उपक्रमाची मुहूर्तमेध रोवली गेली, पर्यावरणपुरक वृक्ष लागवड करून निसर्ग संवर्धन करण्याचा संकल्प या निमित्ताने सर्व पर्यावरण प्रेमींनी केला. यावेळी या प्रकल्पाचे उदगाते रमेश डुंबरे, सरपंच सविता ठोसर, संतोष वाळेकर, रवी ढमाले, सुजित नलावडे, कृष्णा सदाकाळ, शिरीष भोर, पोपट नलावडे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, मोहित ढमाले, अनिलशेठ तांबे, ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे, स्नेहल भोर, कॅप्टन भिकाजी भागवत, आकाश डावखरे, मोहन महाकाळ व ग्रामस्थ उपस्थित होते. या देवराई प्रकल्पात सर्व देशी झाडांची लागवड करण्यात येणार आहेत,भविष्यात चाळीस एकर पेक्षा जास्त गायरान क्षेत्र ग्रामपंचायत मांदारणे वृक्ष लावगवडीसाठी उपलब्ध करून देणार आहेत. याप्रसंगी हम है ना फाऊंडेशनचा वतीने एक पेड शहिद के नाम या संकल्पने अंतर्गत शहिद जावनांच्या नावे काही झाडे लावण्यात आली. यावेळी बोलताना ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांनी सांगितले की, या उपक्रमाची प्रशसा करताना भविष्यात फॉरेस्ट विभागाची जागा देखील या उपक्रमासाठी देण्याची ग्वाही दिली.

### सोलापूर शहर जिल्हा गुन्हेगारांच्या ताब्यात ६ महिन्यात ३६ जण तडीपार

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर शहर आणि जिल्हा सध्या गुन्हेगारांच्या ताब्यात सापडले आहेत. 6 महिन्यात 36 गुन्हेगारांस तडीपार करण्यात आले आहे. सोलापुरात रोज दाखल गुन्ह्यांची सरासरी 18 टक्के इतकी आहे म्हणजेच सोलापूर मध्ये दररोज मोठ्या प्रमाणात गुन्हे घडत असल्यामुळे गुन्हेगारांची संख्या ही मोठी आहे. सोलापूर गुन्हेगारांच्या ताब्यात जात आहे का..? रोज दाखल गुन्ह्याची सरासरी 18 सोलापूर - एकेकाळी शांत, सुसंस्कृत व सुरक्षित म्हणून ओळखले जाणारे सोलापूर आज भीतीच्या सावटाखाली जगत आहे. कारण शहरातील वाढती गुन्हेगारीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जगणे मुश्किल झालेले आहे. सोलापूरातील गुन्ह्यात गेल्या तीन वर्षापासून सातत्याने वाढ होत आहे. दिवसा ढवळ्या हत्या... खून, मारामाऱ्या, दरोडे, चोऱ्या... आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मनात वाढत चाललेली असुरक्षिततेची भावना. सोलापुरातील गुन्ह्याची आकडेवारीच सर्व काही सांगून जातेय. प्रश्न फक्त आकडेवारीचा नाही... प्रश्न आहे आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेचा, आपल्या मुलांच्या भविष्याचा, व आपल्या शहराच्या अस्तित्वाचा.! आज गुन्हेगारांच्या मनात कायद्याची भीती कमी होत चालली आहे की काय, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडू लागला आहे.



### खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पक्षांतराच्या निषेधार्थ आंदोलन!

कोतुळ (स. गांवकरी) : शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षातून बाहेर पडल्याच्या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील कोतुळ येथे शिवसैनिकांनी तीव्र निषेध आंदोलन केले. यावेळी शेकडो शिवसैनिक रस्त्यावर उतरून खासदार वाकचौरे यांच्या पक्षांतराविरोधात घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला. शिवसैनिकांनी सांगितले की, पक्षाने भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना उमेदवारी दिली आणि मतदारांनी मोठ्या मताधिक्याने निवडून दिले. मात्र पक्षाशी निष्ठा न राखता त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. यापूर्वीही पक्षाशी गद्दारी झाल्याचा आरोप करत शिवसैनिकांनी या कृतीचा जाहीर निषेध केला. आंदोलनात जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी, उपतालुकाप्रमुख प्रभाकर फापाळे, माजी शहरप्रमुख सतीश नवले, ॲड. संभाजी जाधव, शहरप्रमुख विनोद देशमुख, युवा सेना शहरप्रमुख पंकज बेळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी पक्षनिष्ठेला तडा देणाऱ्या कोणत्याही कृतीला विरोध कायम राहील, असा इशारा देत आगामी काळातही आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला.



### केबलचोरांचा सुळसुळाट; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान!

कोतुळ (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील कोतुळ परिसरात केबल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मुळा नदीकाठावरील शेतांमध्ये बसविण्यात आलेल्या इलेक्ट्रिक मोटारींच्या केबल्स अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. मुळा नदीतील पाणी खोलवर गेल्याने शेतकऱ्यांना मोटारी नदीपात्रात सरकवत न्याव्या लागतात. त्यामुळे मोटारींसोबत लांब अंतराच्या केबल्स वापरण्याची आवश्यकता भासते. सध्या उष्णतेचा तडाखा आणि पिकांना पाण्याची वाढती गरज लक्षात घेता शेतकरी नियमित सिंचन करत आहेत. मात्र एका शेतकऱ्याने शेताला पाणी देण्यासाठी मोटार सुरू करण्याचा प्रयत्न केला असता ती सुरू झाली नाही. यानंतर नदीकाठी जाऊन पाहणी केली असता मोटारीची केबल चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. शेजारील दुसऱ्या मोटारीची केबलही चोरट्यांनी लंपास केल्याचे आढळून आले. नदीकाठावरील मोटारी आणि वीजखोके यांच्यामध्ये सुमारे ३०० ते ४०० फूट अंतर असल्याने मोठ्या प्रमाणात केबलचा वापर केला जातो. या केबल्स शुद्ध तांब्याच्या (कॉपर) असल्याने त्यांची किंमत प्रत्येकी २५ ते ३० हजार रुपये इतकी आहे. चोरट्यांनी केबल कापून नेल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. कोतुळ, पांगरी, पळसुंडी, धामणगाव पाट आणि परिसरातील नदीकाठच्या भागात अशा चोरीच्या घटना वारंवार घडत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी अकोले पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून चोरट्यांचा बंदोबस्त न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# शेततळ्याचा कागद फाडून टोमॅटो पिकाची नासधूस

## कातळवेढ्यातील शेतकऱ्याचे पाच लाखांचे नुकसान, कारवाईची मागणी : दहा ते बारा दिवस उलटून ही आरोपी मोकाट

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील कातळवेढा येथील शेतकरी राजू दादाभाऊ गाजरे यांच्या शेतात अज्ञात व्यक्तीने घुसून शेततळ्याचे नुकसान करत टोमॅटो पिकाची नासधूस केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या घटनेत शेततळ्याचा कागद फाडण्यात आल्याने त्यातील मोठ्या प्रमाणावरील पाणी वाया गेले असून टोमॅटो पिकासाठी उभारलेला तारांचा मंडपही उद्ध्वस्त करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे सुमारे पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे.



राजू गाजरे यांच्या मालकीची कातळवेढा शिवारातील गट क्रमांक ३८० मधील शेती असून त्यामध्ये शेततळे तसेच पाऊण एकर क्षेत्रावर टोमॅटो पीक लागवड करण्यात आली होती. दि. ८ जून २०२६ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने शेततळ्याचा कागद फाडून त्यातील पाणी बाहेर जाऊ दिले. याचबरोबर टोमॅटो पिकासाठी लावलेल्या तारा कापून मंडपाचेही नुकसान करण्यात आले.

या प्रकरणी राजू गाजरे यांनी पारनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड करीत आहेत.

मात्र घटना घडून दहा ते बारा दिवस उलटूनही पोलीस प्रशासनाकडून घटनास्थळी भेट देण्यात आलेली नसल्याचा आरोप शेतकरी राजू गाजरे यांनी केला आहे. तसेच आरोपींचा शोध घेण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित आरोपींचा तातडीने शोध घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळावा, अशी मागणी होत आहे.

> शेत तळ्यातील कागद फाडून व शेतातील टोमॅटोच्या तारा कट करून नुकसान केले आहे हे नुकसान न भरून निघणारे आहे हातात आलेलं उत्पन्न आता वाया गेले आहे. नुकसान करणाऱ्या त्या संबंधित आरोपीचा पोलीस प्रशासनाने शोध घ्यावा तसेच झालेल्या नुसकानीची भरपाई मिळावी ही मागणी आहे.
> **- राजू गाजरे (नुकसानग्रस्त शेतकरी, काटाळवेढा)**

> काटाळवेढा येथील राजू गाजरे या गरीब शेतकऱ्यांच्या शेततळ्यातील कागद तसेच शेतातील टोमॅटोच्या तारा तोडून अज्ञाताने नुकसान केले गुन्हा दाखल केला तरीही आरोपी शोधला जात नाही शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे शेतकऱ्याला शासन स्तरावरून नुकसान भरपाई मिळावी आरोपीला तात्काळ अटक करण्यात यावी अन्यथा आम्ही आंदोलनाची भूमिका घेऊ.
> **- सोपान गुंड (सामाजिक कार्यकर्ते)**

## खरेदीखत एका गटात, बांधकाम दुसऱ्याच गटात?

पारनेर : (स. गांवकरी)

- ढवळपुरीत सतलोक आश्रम वादाच्या भोवऱ्यात!
- सतलोक आश्रमाचे कार्यक्रम रोखण्याची मागणी, तीव्र आंदोलनाचा इशारा
- आदिवासींच्या जमिनींचे परस्पर व्यवहार कसे झाले? ढवळपुरीतील भूमाफियांविरोधात संताप

तालुक्यातील ढवळपुरी येथील आदिवासी बांधवांच्या जमिनीवरील वाद पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. संबंधित जमीन आदिवासींना प्रत्यक्ष ताब्यात मिळेपर्यंत त्या ठिकाणी सतलोक आश्रम (मुनिंदर धर्मार्थ ट्रस्ट, हरियाणा) यांनी कोणतेही कार्यक्रम घेऊ नयेत, अशी ठाम भूमिका आदिवासी समाजाने घेतली आहे. यासंदर्भात पारनेर पोलीस निरीक्षकांना निवेदन देऊन कडक कारवाईची आणि आवश्यक सहकार्याची मागणी यापूर्वीच करण्यात आली आहे. मागणी करण्यात यावेळी एकलव्य सेनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे, राया ठाकर फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष लहू मधे, सह्याद्री आदिवासी संघटनेचे जिल्हा सचिव संजय पथवे मनाजी मधे, बाळू मधे, मारुती केदार, हिरामण केदार, उमाजी केदार, पोपट केदार, भीमा चिकणे, भाऊ केदार, विश्वनाथ पवार, प्रवीण केदार, पांडू केदार, बाळू चिकणे, जिजाबा मधे, महादू पवार, आदी आदिवासी समाजातील ग्रामस्थ तसेच जमीन धारक उपस्थित होते. निवेदनात नमूद केल्यानुसार, ढवळपुरी येथील आदिवासी समाजाच्या जमिनी बेकायदेशीररीत्या हस्तांतरित करून त्यांची परस्पर खरेदी-विक्री करण्यात आली आहे. यामुळे अनेक आदिवासी कुटुंबे भूमिहीन झाली आहेत.

## उत्तर भागात पेरणीयोग्य पाऊस, शेतकरी सुखावला!



पारनेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील शेतकऱ्यांची पावसासाठीची प्रतीक्षा अखेर संपली आहे. रविवार, दि. २१ जून रोजी सायंकाळच्या सुमारास पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील वासुंदे, शिक्रि, बोकणकवाडी, वडगाव सावताळ, पळशी, नागापूरवाडी आणि खडकवाडी या परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. या मुसळधार पावसामुळे शेतांमध्ये पाणी साचले असून, हा पाऊस पेरणीसाठी अत्यंत उपयुक्त (पेरणीयोग्य) ठरल्याने बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हाळा आणि पावसाच्या दडीमुळे शेतकरी चिंतेत होते. मात्र, रविवारी सायंकाळी अचानक हवामानात बदल झाला आणि विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली . सुमारे तास-दीड तास चाललेल्या या जोरदार पावसामुळे परिसरातील ओढे-नाल्यांना पाणी आले . ज्या भागात पेरणीयोग्य पाऊस झाला आहे, तेथील शेतकऱ्यांनी आता खरीप हंगामातील पेरण्यांची लगबग सुरू केली आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवसांत तालुक्यात सर्वदूर चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून आम्ही पावसाची चातकासारखी वाट पाहत होतो. कडक ऊन आणि उष्णतेमुळे जमिनी सुकल्या होत्या, त्यामुळे पेरण्या कशा होणार अशी चिंता सतावत होती.

पण रविवारच्या पावसाने मोठा दिलासा दिला आहे. आमच्या परिसरातील गावांमध्ये चांगला पेरणीयोग्य पाऊस झाला आहे. जमिनीमध्ये पुरेसा ओलावा निर्माण झाल्यामुळे आम्ही आता खरीप पेरणीच्या तयारीला लागलो आहोत. या पावसाने आमच्या पिकांना आणि आम्हाला नवसंजीवनी दिली आहे. अशी प्रतिक्रिया पळशी येथील स्थानिक शेतकरी लहू मधे यांनी दिली.

**ठराविक भागातच हजेरी**

दरम्यान, हा पाऊस संपूर्ण तालुक्यात सारखा झालेला नाही. तालुक्याच्या उत्तर भागातील ठराविक गावांमध्येच पावसाने धुवांधार हजेरी लावली, तर उर्वरित भागात अद्यापही मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

## कासारे गावात ४०० एकर क्षेत्रावर सेंद्रिय शेती : शिवाजी निमसे

- महिला बचतगटांना सोयाबीन बियाण्यांचे वाटप

पारनेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील जलसंधारण व पाणलोटात आदर्श काम उभे केलेल्या कासारे गावात विषमुक्त शेतीसाठी सरपंच शिवाजी निमसे यांनी पुढाकार घेतला असून पहिल्या टप्प्यात ४०० एकर क्षेत्रावर सेंद्रिय शेतीचा प्रयोग राबविला जाणार आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या माध्यमातून १०० महिला व शेतकरी बचतगटांना माफक दरात सोयाबीन बियाण्यांचे पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष शरद झावरे यांच्या हस्ते शनिवारी वाटप करण्यात आले आहे.



यावेळी प्रगतशील शेतकरी व कृषी अधिकारी बाळासाहेब ठाणगे यांनी कोणत्याही प्रकारचे पिक घेण्या अगोदर माती परिक्षण गरजेचे असुन रासायनिक खतांचा व किटकनाशकांचा वापर न करता शेणखत व गांडूळ खतांचा वापर करण्याचे आवाहन केले.

रासायनिक खते व औषधे यांचा वापर न करता जैविक खते व कीडनाशके गांडूळ खत निर्मिती करत विषमुक्त शेतीसाठी शेतकरी व ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे.यावेळी सरपंच शिवाजी निमसे उपसरपंच शैला देवराम घनवट, मिराबाई शिवाजी निमसे, पूनम गोकुळ निमसे, रोहिणी निमसे, वसंतराव दातीर,संतोष दातीर,तुकाराम साळवे,पोपटराव नरड सर, कल्पना निमसे,गौतमी साळवे,सुनीता निमसे, अलका सूर्यभान निमसे कलाबाई शिंदे, इंदुबाई दातीर, लक्ष्मी तुकाराम साळवे, कृषी अधिकारी बाळासाहेब ठाणगे कृषी अधिकारी देवराम नवरे व पावडे मॅडम, सखाराम नारड तुकाराम साळवे, उत्तम साळवे गोकुळ निमसे, धोंडिभाऊ पानमदं, मिनीनाथ पानमदं,जितेंद्र नरड,

रावसाहेब दातीर,कारभारी दातीर,धोंडिभाऊ नरड, राजु दातीर, रामभाऊ निमसे,अप्पाजी लगड दत्तात्रय दातीर, सचिन निमसे, रामदास खरात, शंकर खरात, बापू नरड, नाना नरड, दत्ता दाते, तुळशीराम शिंदे, बाबाजी कासुटे, मारुती दातीर, रमेश दातीर, सुनील लगड, दादासाहेब निमसे, गोरख घनवट, बाळू घनवट, पोपट नरड सर, गोरख नरड, रामभाऊ दातीर यांच्या सह शेतकरी उपस्थित होते.

> गेल्या तीन दशकांमध्ये कासारे गावात पाणलोट व जलसंधारणची क्रांतीकारी चळवळ उभी राहिली असुन नैसर्गिक ठेवणं असलेल्या गावात दोन वर्षांपासून सरपंच शिवाजी निमसे व त्यांचे बंधूंनी सेंद्रिय शेती धोरण राबवत पुण्यातील नंदनवन संस्थेच्या माध्यमातून कांदा वटाणा घेवडा टॉमेटोचे गहु हरभरा यांचे विक्रमी उत्पादन घेतले आहे. त्यामुळे विषमुक्त शेती बरोबर उत्पादन वाढल्याने सेंद्रिय शेतीचे गाव म्हणून नवी ओळख तयार होत आहे.
> **- सरपंच शिवाजीराव निमसे**

## पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सत्कार

खोडद : (स. गांवकरी)

भारत देशाचा सर्वोच्च पद्मश्री पुरस्काराचे लोककलेचे प्रथम मानकरी रघुवीर खेडकर यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यानिमित्ताने संगमनेर येथे राज्य पुरस्कार प्राप्त हलगी सम्राट केरबा पाटील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महाराष्ट्र शासन समाजभूषण पुरस्कार्थी आणि आद्यगुरु लहुजी साळवे महाराष्ट्र शासन स्मारक समिती सदस्य प्रा.काशिनाथ आल्हाट यांच्या शुभहस्ते पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सत्कार करण्यात आला रघुवीर भाऊ खेडकर ही व्यक्ती तमाशा फड मालक म्हणून कधीही मोठेपणा मिरवत नाही. त्यांना भेटायला आलेल्या महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला त्याच्या नावा गावासह ते ओळखत असतात. ही त्यांची खासियत आहे. तमाशा



क्षेत्रात ज्याप्रमाणे त्यांच्या कलेचा आणि त्यांच्या वर्तनाचा दबदबा आहे. तसाच शासनाच्या दरबारी त्यांचा आदर आहे. भारत देशामध्ये पहिल्यांदा तमाशा कलेला पद्मश्री पुरस्काराचा हा मानाचा तुरा प्राप्त झाला आहे . या पाठीमागे रघुवीर खेडकर यांची फार मोठी तपश्चर्या आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर विविध क्षेत्रात त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लोककलावंतांच्या समस्या शासनाच्या दरबारी मांडून ते योग्य पद्धतीने न्याय देण्याचा निश्चित प्रयत्न करतील.

## शारदा मंदिर हायस्कूल कल्याण शाळेत योगा दिन साजरा

मुरबाड : (स. गांवकरी)

कल्याण शहरातील शारदा मंदिर संस्थेच्या शारदा मंदिर हायस्कूल कल्याण शाळेत आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला. दरवर्षी या शाळेमध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा केला जातो. यावेळी या शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. आंतरराष्ट्रीय योगा दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख यांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी कल्याण शहरातील योग प्रशिक्षक सुनीता वाबळे, वर्षा सांगळे, श्रद्धा गव्हाणे, शकुंतला अग्रवाल यांनी इयत्ता पाचवी ते सातवी आणि इयत्ता आठवी, नववी



या वर्गातील विद्यार्थ्यांना ध्यान, धारणा, मौन, कपालभाती आणि अन्य अनेक योगासन प्रकारांचे धडे दिले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक सुद्धा सहभागी झाले होते. शरीर आणि मन यांना शांती मिळावी आणि शरीराचा समतोलममय विकास व्हावा यासाठी दरवर्षी शारदा मंदिर हायस्कूल कल्याण शाळेत आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा केला जातो. यावेळी गणेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना योग दिनाची माहिती देऊन योगासनांचे महत्त्व सांगितले.

## वेंकटेश पोदार लर्न स्कूल येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

वेंकटेश पोदार लर्न स्कूल, श्रीगोंदा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेत विशेष परिपाठाचे आयोजन करण्यात आले. परिपाठादरम्यान विद्यार्थ्यांना योगाचे शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व तसेच दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याचे फायदे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने योगासने सादर करत निरोगी जीवनशैलीचा संदेश




दिला. सदर उपक्रम शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. बाबू बळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आरोग्यदायी जीवनमूल्यांच्या संवर्धनासाठी शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, शाळेचे संचालक श्री. आनंद शाह सर यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन दिले जाते. या उपक्रमातील विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग, शिस्तबद्ध सादरीकरण आणि योगाविषयीची जागरूकता पाहून शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे विशेष कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण होऊन नियमित योगाभ्यासाचे महत्त्व अधिक दृढ झाले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## आरोग्य, शिस्त आणि सकारात्मक जीवनशैलीस समर्पित

पुणे (स. गांवकरी) : २१ जून २०२६ निरंकारी 'सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज' आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन आशीर्वादाने "आंतरराष्ट्रीय योग दिना" निमित्त संत निरंकारी मिशनच्या विविध शाखांमध्ये योग आणि आध्यात्मिक जागृतीवर आधारित कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. याच अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील आळेफाटा विभाग श्री चंद्रकांत कुऱ्हाडे जी यांनी माहिती देताना सांगितले की, संत निरंकारी मिशनची शाखा घोडेगाव सह आळेफाटा, मंचर, जुन्नर, नारायणगाव येथेही योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात श्रद्धाळू भक्तगण, सेवादल स्वयंसेवक तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आर्ट ऑफ लिविंगचे अनुभवी योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित योग सत्रात सहभागी झालेल्या सर्वांनी योगाभ्यास करून निरोगी आणि संतुलित जीवनशैली अंगीकारण्याचा संकल्प केला.

## ठाणे जिल्ह्यात 'सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षण कार्यक्रम' सुरू

ठाणे (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवा (Comprehensive Primary Health Care - CPHC) प्रशिक्षण कार्यक्रम' अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील प्रशिक्षण सत्रांना प्रारंभ झाला असून, या उपक्रमाचे पहिले प्रशिक्षण सत्र प्राथमिक आरोग्य केंद्र निळजे, तालुका कल्याण येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या आयुष्मान आरोग्य मंदिरांमधील आरोग्य सेवा अधिक सक्षम, परिणामकारक आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. समुदाय आरोग्य अधिकारी (CHO), सहाय्यक परिचारिका प्रसूतीका (ANM), बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW) तसेच आशा स्वयंसेविका यांना अद्ययावत आरोग्यविषयक ज्ञान, कौशल्ये आणि सेवा व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

शिवनेरी (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंबोली येथे इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सव व स्वागत सुशोभीत केलेल्या ट्रॅक्टर मधून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. गावामध्ये ढोल ताशांच्या व लेझीमच्या साथीने इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे मिरवणुकीने काढण्यात आली. विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल आज शाळेत पडणार म्हणून पावलांचे ठसे घेऊन स्वागत झाले. माजी विस्ताराधिकारी निवृत्ती खुटाण यांनी विद्यार्थ्यांना शाल गुलाबपुष्प व इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्य वाटप केले. शालेय सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक शिवाजी भालचिम होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ६० डझन वह्या वाटप

शिवनेरी (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त ओमसाई सेवा मंडळ, कुमशेत यांच्या वतीने इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना ६० डझन वह्यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात गावातून प्रभातफेरी काढून करण्यात आली. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, फेटा बांधून व वाजत-गाजत स्वागत करण्यात आले. यावर्षी इयत्ता पहिलीत १३ तर इयत्ता दुसरीत २ विद्यार्थ्यांचा नव्याने प्रवेश झाला. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके , गणवेशांचे वाटप व शैक्षणिक साहित्य देण्यात आले. पंचायत समिती सदस्या उल्का मोरे, सरपंच रवींद्र डोके ,पत्रकार राजेश डोके व इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

## ऊस बेणे तोडताना वरचा भाग छोटा व खालचा भाग मोठा असावा : सुभाष मोरे

शिवनेरी (स. गांवकरी) : ऊस बेणे तोडताना वरचा भाग छोटा व खालचा भाग मोठा असावा . यामुळे काही तोटा होणार नाही पण उसाच्या वजनात वाढ निश्चित होणार आहे असे श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना जुन्नर/आंबेगाव आयोजित शिरोली खुर्द येथील श्रीराम मंदिरात ऊस विकास मेळावा प्रसंगी अध्यक्ष शुकरकेन डेव्हलपमेंट ग्रुप सुभाष मोरे यांनी सभासदांना मार्गदर्शन केले. ऊस लागवड करण्याअगोदर शेणखत टाकणे किंवा ताग टाकणे फायदेशीर आहे . ऊस बेणे तोडल्यानंतर रासायनिक बीज प्रक्रिया करणे गरजेचे आहे . शिरोली खुर्द, शिरोली बुद्रुक, कुमशेत , हिवरे, ओझर व इतर ठिकाणी आडसाली ऊस लागवड जास्त प्रमाणात आहे . उसाची सरी अडीच फूट किंवा सव्वा दोन फूट काढून एक सरी लागवड करून दुसरी सरी रिकामी सोडणे महत्त्वाचे आहे . बहुतांश शेतकरी साडेचार किंवा पाचफुट ऊस सरी ची लागवड करत आहे . ऊस सात ते आठ महिन्याचा झाल्यानंतर पाचट साळणे महत्त्वाचे असून यामुळे सूर्यप्रकाश उसाच्या खोडा पर्यंत जाऊन उसाचे वजन वाढत आहे असे अध्यक्ष मोरे यांनी सभासदांना सांगितले . पाऊस जास्त झाला का मुलीला जास्त हालचाल करता येत नाही पण पाऊस लांबला का उणीचा प्रादुर्भाव जास्त असतो याबाबत काळजी घेणे गरजेचे आहे . ऊस फवारणी करताना पंप जास्त वेळा हलवणे गरजेचे आहे यामुळे औषध प्रमाण सारखे प्रमाणात होते.


### जाहीर पब्लीक नोटीस

सर्व संबंधितांना व सर्वसामान्य जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, श्री. गंगाराम भागा सदगीर व सिताराम भागा सदगीर यांनी मौजे घोडसरवाडी, ता. अकोले, जि.अ.नगर येथील गट नं.३०७ क्षेत्र १.०३.०० आर या मिळकतीबाबत आपला कायदेशीर हक्क प्रस्थापित करण्यासाठी श्री.बन्सी त्र्यंबक कांगणे, दिलीप बन्सी कांगणे व बबन त्र्यंबक कांगणे यांचे विरुद्ध मे.अकोले न्यायालयामध्ये रे.मु.नं.३०७/२०२६ हा दावा दाखल केलेला आहे.

सदर दावा न्यायप्रविष्ठ असून त्याचा निकाल अद्यापपावेतो लागलेला नाही. त्यामुळे सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीने खरेदी, विक्री, तारण, हस्तांतरण, करार किंवा इतर कोणताही व्यवहार करण्यापूर्वी स्वतः योग्य ती चौकशी करावी. सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार केल्यास तो व्यवहार संबंधीत न्यायालयीन दाव्याच्या अंतिम निकालाच्या अधिन राहील. त्यासंबंधी उद्भवणाऱ्या परिणामांची संपुर्ण जबाबदारी संबंधीत व्यवहार करणाऱ्या व्यक्तीची राहील.

ता.२२/०६/२०२६

ॲडव्होकेट
ॲड.व्ही. बी. भोसले (बी.ए.एल.एल.बी.)
मु.पो.ता.अकोले,जि.अ.नगर


# सोलापुरात भाजपचे राजेंद्र राऊत ४८३ मते घेऊन विजयी

## मोहिते पाटलांची अदृश्य शक्ती ठरली फेल; देशमुखांचा झाला पराभव

सोलापूर : (स. गांवकरी)





सोलापुरात भाजपचे राजेंद्र राऊत 483 मते घेऊन विजयी झाले आहेत तर महाविकास आघाडीचे उमेदवार देशमुख मोठ्या मताने पराभूत झाले आहेत. या निवडणुकीत मोहिते पाटील यांनी केलेला अदृश्य शक्तीचा दावा फेल ठरला आहे. मोहिते पाटलांची अदृश्य शक्ती कामी आली नाही त्यामुळे वसंत नाना देशमुखांचा पराभव झाला

राजेंद्र राऊत 385 मतांनी विजयी झाले असून सोलापूर मध्ये मोठी अटीतटीची लढत पाहायला मिळाली. सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या या विधान परिषद निवडणुकीत भाजपचे उमेदवार माजी आमदार राजेंद्र राऊत हे विजयी झाले आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार वसंत नाना देशमुख यांचा पराभव झाला आहे. विधानपरिषद निवडणुकीसाठी 18 जून रोजी मतदान घेण्यात आले होते .सोमवारी सकाळी आठ वाजल्यापासून सोलापुरातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात मतमोजणी पूर्ण करण्यात आली. भाजपचे राजेंद्र राऊत यांना 483 मते मिळाली असून त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार वसंत नाना देशमुख यांना 118 मते मिळाले आहेत. 16 मते अवैध ठरवण्यात आले आहे. निवडणूक निकालानंतर भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने विजयाचा दावा केला होता ,मात्र त्यांना अपयश आले आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी किमान 500 मते राजेंद्र राऊत यांना पडतील असे सांगितले होते ,मात्र त्यांचाही अंदाज चुकला आहे .राजेंद्र राऊत हे 385 मतांनी आघाडी घेत विजयी झाले.

भारतीय जनता पक्षाने (भाजप) या निवडणुकीत सुरुवातीपासूनच विजयाचा दावा केला होता. भाजपने नगरपालिका, पालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये एकूण ३०७ मते मिळवून बहुमत मिळवले. भाजपला महायुतीतील मित्रपक्ष, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांचाही पाठिंबा मिळाला होता.


भाजपच्या उमेदवाराला करमाळा, माढा आणि माळशिरस येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार गट) आमदारांचा, तसेच सांगोला येथील शेतकरी कामगार पक्षाच्या (शेकाप) आमदारांचा पाठिंबा मिळाला. याशिवाय, जिल्ह्यातील स्थानिक आघाडीनेही भाजपला पाठिंबा देऊन आपली स्थिती आणखी मजबूत केली. मात्र, माढा लोकसभा मतदारसंघाच्या खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, यांच्या विरोधात तसेच निधी वाटप आणि भाजपविरोधी वातावरण यांसारखे मुद्दे उपस्थित करून निवडणूक अधिक तीव्र करण्याचा प्रयत्न केला होता. आणि अदृश्य शक्ती कामी येईल असे म्हटले होते. त्यांच्या म्हणण्यानुसार आघाडीकडे केवळ 16 मते असताना देखील वसंत नाना देशमुख यांना तब्बल 118 मते पडली आहेत म्हणजेच थोड्या फार प्रमाणात अदृश्य शक्तीने काम केले आहे असेच म्हणावे लागेल.

विधानपरिषद निवडणुकीतील विजयानंतर राजेंद्र राऊत यांनी प्रतिक्रिया देत मतदारांचे आभार मानले. यावेळी त्यांनी मोहिते पाटील यांच्याविरोधात अकलूज येथे अधिवेशन संपल्या नंतर मोठी जंगी सभा घेण्यात येणार असल्याचेही जाहीर केले. सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत भाजपा-महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री. राजेंद्र राऊत यांना मिळालेला दणदणीत विजय हा जनतेचा, कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांचा आणि विकासाच्या राजकारणावरील विश्वासाचा विजय आहे, त्यांच्या आमदारपदी झालेल्या निवडीबद्दल मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन!

> सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण अधिक जोमाने कार्य कराल, तसेच जनतेच्या अपेक्षा आणि विश्वासाला सार्थ ठरवाल, असा दृढ विश्वास आहे. आपल्या पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा..!
>
> **- पालकमंत्री सोलापूर जयकुमार गोरे**

# पुण्यातील पाणी कपातीवर पर्याय

पुणे : (स. गांवकरी)



■ 'डेड स्टॉक' वापरण्याची सामाजिक कार्यकर्ते जयंत इनामदार यांची मागणी

पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा केवळ २४.३० टक्क्यांवर आल्याने शहरात पाणी कपात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील विविध इमारतींमध्ये असलेल्या अग्निशमन टाक्यांमधील (फायर टँक) 'डेड स्टॉक' पाणी वापरण्याचा पर्याय विचारात घ्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जयंत इनामदार यांनी पत्रकार परिषदेत केली. या संदर्भात बोलताना इनामदार यांनी म्हटले आहे की, पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये अत्यल्प साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर अनेक भागांत टँकरच्या पाण्याचे दर वाढू लागल्याचेही त्यांनी नमूद केले. शहरातील बहुतांश मोठ्या इमारतींमध्ये जमिनीखाली अग्निशमनासाठी स्वतंत्र पाण्याच्या टाक्या असून, त्यातील पाणी आग लागल्याशिवाय वापरले जात नाही. अशा टाक्यांमधील साठ्याची एकत्रित गणना केल्यास तो जवळपास पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या एका धरणाच्या साठ्याइतका असू शकतो, असा दावा त्यांनी केला आहे. गेल्या १० ते १५ वर्षांपासून अग्निसुरक्षा क्षेत्राचा अभ्यास करताना आणि विविध आगीच्या घटनास्थळी भेटी दिल्यानंतर, प्रत्यक्षात आग विझवण्यासाठी फायर टँक तसेच रस्त्यांवरील फायर हायड्रंटमधील पाणीच वापरले जात असल्याचे निरीक्षण समोर आल्याचे इनामदार यांनी सांगितले.

# ४९ प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर पदोन्नती

ठाणे : (स. गांवकरी)



जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभागामार्फत केंद्रप्रमुख पदाच्या रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया पारदर्शक व गुणवत्ताधारित पद्धतीने पूर्ण करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या उपस्थितीत दि. १९ जून, २०२६ रोजी जिल्हा परिषद सभागृहात आयोजित समुपदेशन कार्यक्रमात ४९ प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर पदोन्नती देण्यात आली.

"केंद्रप्रमुख हे शैक्षणिक व्यवस्थेतील महत्त्वाचे नेतृत्व करणारे घटक आहेत. शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच शिक्षकांना प्रभावी मार्गदर्शन करण्यासाठी त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पदोन्नती प्रक्रियेत पारदर्शकता, गुणवत्ता व न्याय्यतेची तत्त्वे जपण्यात आली आहेत. नवनियुक्त केंद्रप्रमुखांनी आपल्या नेतृत्वातून शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणत जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहावे," असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी केले. सदर पदोन्नती प्रक्रियेसाठी एकूण १२३ उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यापैकी ८५ उमेदवार पात्र ठरले असून ३४ उमेदवार अपात्र ठरले. दिव्यांग प्रवर्गातील ५ उमेदवार पात्र ठरले होते.

सर्वसाधारण गटातील ४९ रिक्त केंद्रप्रमुख पदे भरण्यासाठी गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक १ ते ५१ मधील उमेदवारांना (अनुक्रमांक १७ व १९ वरील अपात्र उमेदवार वगळून) समुपदेशनासाठी संधी देण्यात आली. समुपदेशनादरम्यान गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक ५१ वरील श्री. गोपाळ रोहिदास म्हात्रे यांनी केंद्रप्रमुख पदाची पदस्थापना स्वीकारण्यास लेखी नकार दिल्याने गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक ५२ वरील श्रीमती दिपाली विजय बडगुजर यांना केंद्र निवडीची संधी देण्यात आली. याप्रमाणे गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक १ ते ५२ मधील उमेदवारांपैकी दोन अपात्र उमेदवार व एका उमेदवाराचा नकार वगळता एकूण ४९ उमेदवारांनी समुपदेशन प्रक्रियेद्वारे समूह साधन केंद्रांची निवड करून पदस्थापना निश्चित केली. यावेळी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी तसेच प्राथमिक शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनियुक्त केंद्रप्रमुखांच्या वतीने प्रतिनिधींनी जिल्हा परिषद प्रशासनाने पदोन्नती प्रक्रिया गतिमान, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच संपूर्ण प्रक्रियेदरम्यान शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने मार्गदर्शन व पाठपुरावा केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्याप्रतीही कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. जिल्हा परिषद ठाणे प्रशासनाच्या वतीने शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वृद्धी, शैक्षणिक व्यवस्थापनाची परिणामकारकता आणि शाळांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केंद्रप्रमुखांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# स्व. अमृतलालजी खिवराज गुगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आदर्श उपक्रम

### ५०० आंबे झाडांचे वाटप : गुगळे परिवाराने जपली दुःखाच्या प्रसंगात सामाजिक बांधिलकी

पारनेर : (स. गांवकरी)




सावरगाव येथील स्व. अमृतलालजी खिवराज गुगळे यांच्या दशक्रिया विधीनिमित्त गुगळे परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा स्तुत्य उपक्रम राबविला. या निमित्ताने सावरगाव ग्रामपंचायत परिसर तसेच आजूबाजूच्या वाडी-वस्तीतील नागरिकांना तब्बल ५०० आंबा रोपांचे मोफत वाटप करण्यात आले. स्व. अमृतलालजी गुगळे यांनी आयुष्यभर कष्ट, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेची मूल्ये जपली. सामान्य परिस्थितीतून कुटुंब उभे करताना त्यांनी आपल्या परिवाराला सामाजिक जबाबदारीची जाणीव दिली. त्यांच्याच विचारांचा वारसा पुढे नेत गुगळे परिवाराने दुःखाच्या प्रसंगी समाजोपयोगी उपक्रम राबवून त्यांना आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण केली.

या उपक्रमाचे आयोजन स्व. अमृतलाल गुगळे यांचे बंधू सावरगावचे माजी उपसरपंच प्रदीप गुगळे, सुभाष गुगळे, इंद्रभान गुगळे व समस्त गुगळे परिवाराच्या वतीने करण्यात आले. वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेऊन नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले. परिसरात या उपक्रमाची मोठी चर्चा होत असून गुगळे परिवाराचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून स्व. अमृतलालजी गुगळे यांना श्रद्धांजली वाहिली व गुगळे परिवाराचे सांत्वन केले. कार्यक्रमास आमदार काशिनाथ दाते, आमदार शरद सोनवणे, शिवसेना नेते सुजित झावरे पाटील, दीपक लंके, सभापती गंगाराम बेलकर, वसंत चेडे, जीवन शिंदे, विजू औटी, शिवाजी बेलकर, रविंद्र राजदेव, अमोल उगले, किरण ठुबे, संजय गांधी, शैलेश चोरडिया यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुःखद प्रसंगातही समाजाला काहीतरी देण्याची भावना जपत राबविण्यात आलेला हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, पर्यावरण संवर्धनासाठी अशीच सामाजिक चळवळ उभी राहण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ साठी ठाणे जिल्हा सज्ज

ठाणे : (स. गांवकरी)

■ ३६ परीक्षा केंद्रांवर २१ हजारांहून अधिक परीक्षार्थी देणार परीक्षा

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने रविवार दि. २८ जून, २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२६ साठी ठाणे जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषदेने व्यापक नियोजन केले असून परीक्षा सुरळीत, पारदर्शक व सुरक्षित वातावरणात पार पडण्यासाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ साठी ठाणे जिल्ह्यात एकूण ३६ परीक्षा केंद्रांची निवड करण्यात आली असून ही सर्व केंद्रे माध्यमिक शाळांमध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहेत. संबंधित मुख्याध्यापकांची संमती प्राप्त करून परीक्षा केंद्रांचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. या परीक्षेचा पेपर क्रमांक १ सकाळी १०.३० ते दुपारी १.०० या वेळेत तर पेपर क्रमांक २ दुपारी २.०० ते सायंकाळी ४.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. पेपर क्रमांक १ साठी जिल्ह्यातील ३६ केंद्रांवर ९ हजार ५९१ परीक्षार्थी परीक्षा देणार असून पेपर क्रमांक २ साठी ११ हजार ६९२ परीक्षार्थी नोंदणीकृत आहेत. अशाप्रकारे एकूण २१ हजार २८३ परीक्षार्थी या परीक्षेला सामोरे जाणार आहेत. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत जिल्हा सनियंत्रण समितीची सभा दि. 16 जून रोजी घेण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा समितीच्या नियंत्रणाखाली परीक्षा व्यवस्थापनासाठी संपूर्ण यंत्रणा कार्यरत राहणार आहे.

# विरोधानंतर उपबाजार समितीसाठी नव्या जागांची चाचपणी

■ सभापती गंगाराम बेलकर ॲक्शन मोडमध्ये!

■ कासारे फाटा व कर्जुले हर्या येथे जागेची पाहणी

■ शेतकऱ्यांची २५ वर्षांची मागणी पूर्ण करण्यासाठी हालचालींना वेग



पारनेर : (स. गांवकरी)

टाकळी ढोकेश्वर येथे प्रस्तावित उपबाजार समितीला स्थानिक ग्रामस्थांनी विरोध दर्शवल्यानंतर, पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर यांनी इतर ठिकाणी पर्यायी जागा शोधण्यास वेगाने सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर, टाकळी ढोकेश्वरपासून ५ ते ७ किलोमीटर अंतरावर असलेल्या कासारे फाटा तसेच कर्जुले हर्या येथील औद्योगिक वसाहतींच्या जागांची पाहणी सभापती बेलकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह केली. पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात एक हक्काची उपबाजार समिती असावी, ही गेल्या २५ वर्षांपासूनची स्थानिक शेतकऱ्यांची जुनी आणि हक्काची मागणी आहे. त्यानुसार टाकळी ढोकेश्वर येथील गायरान क्षेत्रावर बाजार समितीसाठी मोजणी देखील करण्यात आली होती. मात्र, स्थानिक ग्रामस्थांनी या जागेवर बाजार समिती होण्यास विरोध केल्यामुळे प्रशासनाला आपला निर्णय बदलावा लागला. या विरोधानंतर आता तालुक्यात इतरत्र जागा मिळवण्याच्या हालचालींना वेग आला आहे. टाकळी ढोकेश्वरचा विरोध पाहता, आता कर्जुले हर्या, सावरगाव, वासुंदे, खडकवाडी आणि वडगाव सावताळ या गावांमधून उपबाजार समितीसाठी जागा उपलब्ध होऊ शकते. या भागातील स्थानिक ग्रामस्थ आता स्वतःहून सभापती गंगाराम बेलकर यांच्याशी संपर्क साधत असून, बाजार समिती आपल्याच भागात व्हावी, अशी मागणी करत आहेत. सभापती गंगाराम बेलकर यांनी नुकतीच कासारे फाटा आणि कर्जुले हर्या येथील संभाव्य जागांची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. या पाहणी दौऱ्याप्रसंगी पारनेर बाजार समितीचे सचिव सुरेश आढाव, माजी उपसभापती बापूसाहेब शिर्के, सचिन वाफारे, शिवाजी वाफारे, शरद उंडे, भरत आंधळे, रामदास शिर्के, गंगाराम उंडे, संतोष उंडे, उत्तम आंधळे, वसंत आंधळे, शशिकांत आंधळे, हरी उंडे, मयुर आंधळे, साहेबराव आंधळे, महादू उंडे, हरिभाऊ शिर्के, सचिन आंधळे आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी ही उपबाजार समिती लवकरच योग्य ठिकाणी आकारास येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

> तालुक्याच्या उत्तर भागात बाजार समिती व्हावी अशी गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी आहे 40 ते 50 गावांचा संपर्क असल्याने टाकळी ढोकेश्वर ला बाजार समिती व्हावी. ही या भागातील शेतकऱ्यांची विशेष मागणी आहे परंतु स्थानिक ग्रामस्थांनी केलेल्या विरोधामुळे आम्हाला इतर ठिकाणी जागेची आम्ही आता चाचणी करत आहोत परंतु टाकळी ढोकेश्वरकरांनी पुनर्विचार करावा व जागा उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे.
>
> **- गंगाराम बेलकर, (सभापती : कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेर)**

# नागवडे इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये फादर्स डे उत्साहात साजरा



**श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)**

तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित नागवडे इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये फादर्स डे अर्थात 'पितृ दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानदीप शिक्षण संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड होते. यावेळी तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे निरीक्षक एस. पी. गोलांडे तसेच सोनिया गांधी पॉलिटेक्निकचे प्राचार्य अमोल नागवडे उपस्थित होते.

कार्यक्रमात वेदांत गाडेकर आणि आकांक्षा रोडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. घोडके यांनी 'एकत्र कुटुंब पद्धती आणि त्याचे फायदे' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच विकास खेतमाळीस यांनी पितृ दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना मुलांना मोबाईलपासून दूर ठेवण्याची गरज अधोरेखित केली. फादर्स डे सारखा स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल त्यांनी शालेय प्रशासनाचे कौतुक केले.

यावेळी विद्यार्थिनींनी सादर केलेल्या आकर्षक नृत्याने उपस्थित पालक मंत्रमुग्ध झाले. तर 'दमलेल्या बापाची कहाणी तुला' या गीताच्या सादरीकरणाने वडील आणि मुलांमधील भावनिक नात्याचे हृदयस्पर्शी चित्र उभे राहिले. अनेकांच्या डोळ्यांच्या कडा यावेळी पाणावल्या. कार्यक्रमात पालकांसाठी बलून रेस आणि कोन बॅलन्सिंग यांसारख्या मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत खेळांचा आनंद घेतला. आपल्या वडिलांना खेळताना पाहून विद्यार्थ्यांनीही मोठा जल्लोष केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका नीतू दुलानी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जयेश आनंदकर आणि प्रा. राहुल भांडवलकर यांनी केले, तर प्रा. सुरेश म्हेत्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.




मुरबाड : मुरबाड तालुक्यातील पशेणी गावचे सेवाभावी पोलिस पाटील देविदास पांडुरंग धुमाळ यांचा नुकतच पशेणी गावात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मुरबाड पोलिस स्टेशन यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. गेली १८ वर्षे ते पशेणी गावचे पोलिस पाटील म्हणून काम करत आहेत. त्याअगोदर त्यांचे दिवंगत वडील पांडुरंग धुमाळ यांनी तब्बल ३२ वर्षे पशेणी गावचे पोलिस पाटील म्हणून काम केले होते. त्यांनी महाराष्ट्र पोलिस पाटील संघटनेचे उपाध्यक्ष म्हणून काम केले होते.

## थोडक्यात बातम्या...




### स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून आर्वी शाळेत वृक्षारोपण

खोडद (स. गांवकरी) : स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष प्रभाकर बांगर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जुन्नर तालुक्यात आर्वी आणि पिंपळगाव या दोन जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना वह्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच शाळेच्या परिसरामध्ये वृक्ष लागवड करून पर्यावरण वाचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून ते जगविण्यासाठी प्रयत्न करावे असा संदेश देण्यात आला हा उपक्रम प्रमोद खांडगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आला. स्वाभिमानी शेतकरी संघटना तालुकाप्रमुख प्रमोद खांडगे पाटील, ग्राहक कल्याण फाउंडेशन तालुकाध्यक्ष के.डी आण्णा सरोदे,वैभव भिसे, ग्राहक कल्याण फाउंडेशन कार्याध्यक्ष जुन्नर सौ, वंदनाताई वाकचौरे, स्वाभिमानीचे प्रवीण डोंगरे पाटील मुख्याध्यापक आर्वी ढवळे सर, मुख्याध्यापक पिंपळगाव रोकडे सर यांनी पर्यावरण विषयक जनजागृती प्रबोधनपर भाषणे केली. यावेळी दीपक गाढवे आर्वी गावचे सरपंच कुलदीपशेठ डोंगरे भरत गाढवे विनोद डोंगरे यांच्यासह शालेय विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी शाळेच्या परिसरात लावलेल्या झाडांचे संगोपन केले जाईल असा शब्द यावेळी दिला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रभाकर बांगर यांना देखील उपस्थित सर्वांनी मनापासून शुभेच्छा दिल्या आभार शाळा व्यवस्थापन समितीचे जयहिंदराव डोंगरे मानले. कार्यक्रमाची सांगता झाली.

### ओतूर परिसरातील अपघातात बाप लेकीचा मृत्यू

खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील नगर-कल्याण महामार्गावर ओतूर येथील निमंत्रण हॉटेलजवळ रविवारी दि. २१ दुपारी १२.१६ च्या सुमारास एक भीषण अपघात घडला. या अपघातात एका पित्याचा आणि त्यांच्या ३ वर्षांच्या मुलीचा जागीच मृत्यू झाला आहे. आळेफाटा येथून कल्याणच्या दिशेने जाणारी मोटारसायकल (MH 17 DD 3215) आणि कल्याणहून आळेफाट्याकडे येणारा आयशर ट्रक (MH 04 MR 8867) यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की मोटारसायकलवरील पाचही जण १० ते १५ फूट दूरवर फेकले गेले. या संपूर्ण घटनेचे थरारक दृश्य परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. या दुर्घटनेत अजय बबन दुधवडे वय २१ वर्षे आणि त्यांची ३ वर्षांची मुलगी अनुजा अजय दुधवडे रा. माळवंदवाडी, घारगाव, जि. अहिल्यानगर यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात सलोनी अजय दुधवडे, तनुजा अजय दुधवडे आणि सुदर्शन गौतम केदार हे तिघे जखमी झाले असून, त्यांच्यावर आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. रस्ते मोकळे करून वाहतूक सुरळीत करण्यात आली असून, ओतूर पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्यात आली आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### राष्ट्रीय अध्यक्षपदी डॉ. किशोर देशपांडे यांची नियुक्त



कळवण (स. गांवकरी) : सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रहिताच्या कार्यात सातत्याने योगदान देणारे नाशिक येथील ज्येष्ठ समाजसेवक व जनसंपर्क क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व डॉ. किशोर देशपांडे यांची ब्रह्मराष्ट्र एकम विश्व महासंघ न्यास, श्रीकुल पीठ यांच्या वतीने "धर्मार्थ कार्य एवं जनसंपर्क प्रकोष्ठ" राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे ब्रह्मराष्ट्र एकम विश्व महासंघाचे पीठाधीश आणि राष्ट्रीय अध्यक्ष परमपूज्य श्री 1008 डॉ. सचिन नाथ जी महाराज यांनी त्यांना मनोनयन व शुभाशीर्वाद पत्र प्रदान करून ही जबाबदारी सोपवली आहे. समाजसेवा, संघटन कौशल्य, राष्ट्रप्रेम आणि सनातन संस्कृतीच्या जतनासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. सनातन संस्कृतीच्या जतनासाठी मोठी जबाबदारी ब्रह्मराष्ट्र एकम विश्व महासंघ ही केवळ एक संस्था नसून राष्ट्रसेवा, संस्कृती संवर्धन, आध्यात्मिक जागृती आणि सामाजिक परिवर्तन यासाठी कार्यरत असलेली व्यापक चळवळ आहे. समाजात धर्म, संस्कार आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी संस्था विविध उपक्रम राबवत आहे.जनसंपर्कातून समाजजागृतीची अपेक्षा डॉ. किशोर देशपांडे यांच्याकडे धर्मार्थ कार्य आणि जनसंपर्क प्रकोष्ठाची धुरा सोपविण्यामागे समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचा संस्थेचा उद्देश असल्याचे मानले जात आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ संस्थेला मिळणार असून ग्रामीण भागातील युवक, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांपर्यंत संस्थेचे कार्य अधिक प्रभावीपणे पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आजच्या काळात समाजात वाढत चाललेली वैचारिक दरी, संस्कारांचा अभाव आणि सामाजिक प्रश्नांची गुंतागुंत पाहता अशा संस्थांच्या माध्यमातून सकारात्मक विचारांची चळवळ उभी राहणे गरजेचे आहे. डॉ. देशपांडे यांची नियुक्ती ही केवळ पदप्राप्ती नसून समाजहित,

# श्रीगोंदा तालुक्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा तालुका: (स. गांवकरी)**



२१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त श्रीगोंदा तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये सकाळी ७ वाजता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत योगाचे महत्त्व जाणून घेतले. अनेक शाळांमध्ये तज्ज्ञ योगाचार्यांनी मार्गदर्शन करत विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके सादर केली. योगामुळे स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते, शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते तसेच विविध विकारांपासून संरक्षण मिळते, या उद्देशाने विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले. तालुक्यातील विविध शिक्षण संस्थांनी योग दिन साजरा करून विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यासासाठी प्रेरित केले. लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी योगाचार्य शिवाजीराव पांडव व कुलांगे फिटर यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखवली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत योगाचे विविध प्रकार आत्मसात केले. पाठीवर झोपून, पोटावर झोपून करण्यात येणारी आसने तसेच सूर्यनमस्काराचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमास प्राचार्य बाळासाहेब जठार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आरोग्य उपकेंद्राचे कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, लिंपणगाव येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातही आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात पार पडला. ज्येष्ठ योगाचार्य बाळासाहेब घायाळ आणि प्रा. सदाशिव उंडे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगत विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी बोलताना बाळासाहेब घायाळ म्हणाले की, योगामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होते, शरीर तंदुरुस्त राहते, कार्यक्षमता वाढते आणि जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. त्यामुळे प्रत्येकाने नियमित योगाभ्यास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमांना विद्यालयांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# कॅलिफोर्निया बदामांसह 'सुपर सकाळ'ची सुरुवात




**पुणे : (स. गांवकरी)**

दिवसाची सुरुवात ज्या पद्धतीने होते, त्यावर संपूर्ण दिवसाची गुणवत्ता अवलंबून असते. निरोगी सकाळच्या सवयींचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाच्या वतीने पुण्यातील शेरेटन ग्रँड येथे 'हर सुबह की सुपर शुरुआत : कॅलिफोर्निया बदाम के २४ न्यूट्रिएंट्स के साथ' या विषयावर विशेष संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचे संचालन मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली येथील डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख आणि पोषणतज्ज्ञ ऋतिका समद्दार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरजे उत्सवी यांनी केले. अभिनेत्री उर्मिला कानेटकर यांच्यासह जीवनशैली क्षेत्रातील प्रभावक साक्षी अग्रवाल, शिल्पा मेहर आणि हर्षा खत्री यांनी या चर्चेत सहभाग घेतला. सकाळच्या योग्य सवयी आणि पौष्टिक आहाराचा आरोग्यावर होणारा परिणाम याविषयी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. दैनंदिन आहारात कॅलिफोर्निया बदामांचा समावेश केल्यास आरोग्यदायी जीवनशैलीला चालना मिळू शकते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय योग दिन आर्वीकेंद्र शाळेत उत्साहात साजरा



**खोडद : (स. गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आर्वीकेंद्र येथे दि. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देत विविध योगासने व प्राणायामाचा सराव घेण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वृक्षासन, ताडासन, भुजंगासन, त्रिकोणासन, वज्रासन तसेच सूर्यनमस्कार यांसारख्या विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर केले. योगाभ्यासामुळे शरीर निरोगी, मन प्रसन्न व एकाग्र राहण्यास मदत होते, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः विद्यार्थ्यांनी वृक्षासनाचा सराव करून संतुलन, आत्मविश्वास व एकाग्रता वाढविण्याचा संदेश दिला. सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. यावेळी "एक पृथ्वी, एक आरोग्य यासाठी योग" हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण झाली असून निरोगी जीवनशैलीचा संकल्प करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती भारती आल्हाट मॅडम व उपशिक्षक श्री साईनाथ कनिंगध्वज सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ.तेजस्विनीताई आशिष गाढवे व उपाध्यक्ष भाग्यश्रीताई स्वप्नील गाढवे केंद्रप्रमुख सौ.शोभा डोंगरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीत भाजपाचे अमरनाथ राजुरकर विजयी

## मतमोजणी शांततेत व सुरळीत संपन्न



**नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे उमेदवार अमरनाथ राजुरकर यांना विजयी घोषित करण्यात आले. विजयी उमेदवार अमरनाथ राजूरकर यांना निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

निवडणुकीतील मतदानाची मतमोजणी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन दि २२ जून रोजीपार पडली. मतमोजणीनंतर अमरनाथ राजूरकर यांना ३३९ मताधिक्य मिळवत विजय संपादन केल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जाहीर केले. यावेळी निवडणूक निरिक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे या उपस्थित होत्या.

नांदेड विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणात भारतीय जनता पार्टीचे उमेदवार अमरनाथ राजुरकर व अपक्ष उमेदवार कृष्णा नागेश पाटील, प्रशांत इंगोले असे एकूण ३ उमेदवार होते. या निवडणुकीसाठी झालेल्या मतदानात जिल्ह्यातील आठ मतदान केंद्रावर ४५२ पैकी ४५१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. या मतांची मतमोजणी आज नियोजनच्या भवनच्या कॅबिनेट हॉल येथे कडेकोट बंदोबस्तात शांततेत पार पडली. मतमोजणीपुर्वी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी मतमोजणीच्या प्रक्रियेबाबत मतमोजणी अधिकारी-कर्मचारी यांना निर्देश दिले. यावेळी उमेदवार तसेच मतमोजणी प्रतिनीधीही उपस्थित होते. तीन टेबलवर मतमोजणी अधिकारी, सहायक अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून मतमोजणी करण्यात आली. या मतमोजणीत ४२८ मते वैध ठरली. त्यापैकी अमरनाथ राजूरकर यांना ३३९ मते मिळाली तर अपक्ष उमेदवार कृष्णा नागेश पाटील यांना ८४ तर प्रशांत विराज इंगोले यांना ५ मते मिळाली. मतमोजणीत २३ मते अवैध ठरविण्यात आली.

मतमोजणीनंतर निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय जनता पार्टीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांना विजयी घोषित केले. यावेळी निवडणूक निरिक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे यांच्यासह मतमोजणी प्रक्रियेत सहभागी अधिकारी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी सामान्य अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी निवडणूक राजकुमार माने, उपजिल्हाधिकारी (रोहयो) हनुमंत कोळेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, भोकरचे उपविभागीय अधिकारी प्रविण मेगशेट्टी, देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसिलदार संजय वारकड आदींसह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती. मतमोजणी प्रक्रिया तसेच स्थानिक प्राधिकारी निवडणुकीची सर्वच प्रक्रिया शांतता व सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी सहकार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचारी तसेच विविध घटकांचे उपजिल्हाधिकारी निवडणूक राजकुमार माने यांनी आभार मानले.

# श्रीगोंदा, दौंड आणि शिरूर तालुक्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार

**श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)**



श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील मा.श्री.बबनरावजी पाचपुते विचारधारा ट्रस्ट चे परिक्रमा शैक्षणिक संकुलातील परिक्रमा पॉलिटेक्निक तर्फे चालू वर्षी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण बोर्डाच्या इयत्ता 10 वी.परीक्षेमध्ये श्रीगोंदा,दौंड आणि शिरूर या तालुक्यातील विविध शाळेतील प्रत्यक्ष माध्यमिक शाळेत जाऊन जे गुणवंत विद्यार्थी उत्कृष्ट गुणाने पास झाले त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा व संबंधित प्राचार्य आणि शिक्षक यांचा गौरव करण्यात आला.

गौरव करण्यात आलेले माध्यमिक शाळा व गुणवंत विद्यार्थी R.R.P.F. दौंड स्कूल प्रथम क्रमांक - निरू निनाद वाघजकर - 95%द्वितीय क्रमांक - अनुष्का अर्जुन टेकावड - 92.40%तृतीय क्रमांक - कृष्णा महादेव लगड - 90.80%श्री गुप्तेश्वर माध्यमिक विद्यालय, मोरेवस्ती प्रथम क्रमांक - सुरज लक्ष्मण शिंदे - 90.00%द्वितीय क्रमांक - विवेक मनोज मोहिते - 89.00%तृतीय क्रमांक - ओंकार विजय भिसे - 80.00%सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय, देऊळगाव राजे प्रथम क्रमांक - लावर सानिका दत्तात्रय - 89.40%द्वितीय क्रमांक - भोसले दिशा बाबासाहेब - 88.60%तृतीय क्रमांक - खराडे मोहिनी सदानंद - 87.60%न्यू इंग्लिश स्कूल, जलालपूर प्रथम क्रमांक - खैरे साईराज पंडित - 91.20%द्वितीय क्रमांक - कासारे शिवाजी बाळासाहेब - 90.00%तृतीय क्रमांक - गावडे प्रतीक्षा लालासाहेब - 89.40%फिरंगाई माध्यमिक विद्यालय, कुरकुंभ प्रथम क्रमांक – सार्थक विजय यादव - 94.40%द्वितीय क्रमांक – समृद्धी देविदास साळुंके 93.20%तृतीय क्रमांक – उदय ताताजी जाधव - 92.40%श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालय, सोनवडी प्रथम क्रमांक - कल्पना संजय राठोड - 77.80%द्वितीय क्रमांक - गणेश रवी चव्हाण - 77.00%तृतीय क्रमांक - सिद्धी निलेश लोखंडे - 76.80%न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव प्रथम क्रमांक - विशाल तुकाराम गोडसे - 94.80%द्वितीय क्रमांक - उवेज अमजद तांबोळी - 93.60%तृतीय क्रमांक - कृष्णा संजय मांडे - 93.00%श्री वळणेश्वर विद्यालय, अजनूज प्रथम क्रमांक - योगेश गिरमकर- 89.80%द्वितीय क्रमांक - श्रेयश यादव - 88.60%तृतीय क्रमांक - तनिष्का गिरमकर - 88.00%महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा प्रथम क्रमांक - धोंडे निशांत नवनाथ - 94.40%द्वितीय क्रमांक - डेबरे आदित्य सुनील - 93%तृतीय क्रमांक - चव्हाण अभिजीत बाळू - 92.80%खंडेश्वर माध्यमिक विद्यालय, येळपणे प्रथम क्रमांक – कळमकर प्रसाद सोन्याबापू - 96%द्वितीय क्रमांक – पठारे वैष्णवी रोहिदास - 93.20%तृतीय क्रमांक – धावडे तन्वी संतोष - 93%कौठा माध्यमिक विद्यालय, कौठा प्रथम क्रमांक - शेलार भाग्यश्री लक्ष्मण - 92%द्वितीय क्रमांक - घोलप ऋतुराज युवराज - 85%तृतीय क्रमांक - घोलप श्रितेज शहाजी - 72%पदमश्री आप्पासाहेब पवार माध्यमिक विद्यालय, बाभूळसर प्रथम क्रमांक - पायल सचिन गरुड - 91.00%द्वितीय क्रमांक - शर्वरी नितीन कोंडे - 89.00%तृतीय क्रमांक - जिग्नेश नानासो नागवडे -88.80%साईकृपा माध्यमिक विद्यालय, टाकळी लोणार प्रथम क्रमांक - विभावरी नवनाथ मोटेकर - 89.80%द्वितीय क्रमांक - मुस्कान प्यारेलाल शेख - 86%तृतीय क्रमांक - वैष्णवी संतोष पडळकर - 81.40%कै. भाऊसाहेब भागवत माध्यमिक विद्यालय लिंगाळी माळेवाडी दौंड प्रथम क्रमांक - धनाजी संभाजी मर्गळ - 86.40%द्वितीय क्रमांक - अपूर्वा अजित येडे - 84.20%तृतीय क्रमांक - श्रुती राजेंद्र चव्हाण - 83.60%श्रीमती जिजामाता भाऊसाहेब भागवत माध्यमिक विद्यालय, गोपाळवाडी प्रथम क्रमांक - जाधव कार्तिक केशव - 88.20%द्वितीय क्रमांक - भुजबळ कार्तिकी सुरेश - 85.40%

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)